**महत्वाचे**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.
मुख्य लेखा परिक्षण विभाग,
क्र : मुलेप/६/कावि/१५/२०१५
दिनांक:-१३/०७/२०१५

**विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या लेखापरिक्षणातील प्रलंबित आक्षेपांच्या पुर्ततेबाबत...**

**संदर्भ :- १) इकडील अ.शा.पत्र क्र. मुलेप/१/कावि/११२/१४, दि. १२/११/२०१४**
**२)इकडील परिपत्रक क्र.मुलेप/१/कावि/१५३/१४, दि. २२/१२/२०१४**

**परिपत्रक,**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांचे आर्थिक वर्षानुसार लेखा परिक्षणाचे कामकाज मुख्य लेखापरिक्षण विभागामार्फत करण्यात येते. सदर लेखापरिक्षणातील **प्रलंबित आक्षेपांची संख्या दि.३१ मे २०१५ अखेर ३१२२५** एवढ्या प्रमाणात आहे. प्रलंबित आक्षेपांचे अनुपालन सर्व शाखाप्रमुखांनी वैयक्तिक लक्ष देवून व योग्य तो पाठपुरावा करून प्राधान्याने करणेबाबत उपरोक्त संदर्भिय १ व २ अन्वये, तसेच शाखाप्रमुखांचे सभेतही सुचना दिलेल्या आहेत. **तथापि प्रलंबित आक्षेप, वसुलपात्र रकमा मोठ्या प्रमाणावर असूनही सर्व संबंधित शाखाप्रमुख आक्षेपांचे अनुपालन करणे संदर्भात उदासिन असल्याचे दिसून येते. प्रलंबित आक्षेप मोठ्या प्रमाणावर असल्याने वारंवार दैनिकामध्ये बातम्या प्रसिध्द होत आहेत.**

सबब, प्रलंबित आक्षेप, वसुलपात्र रकमा या महानगरपालिकेच्या आर्थिक हिताशी निगडीत असल्याने प्रलंबित आक्षेपांची पुर्तता नियमित करण्यात यावी. **या महिन्या अखेर विभागाकडील प्रलंबित आक्षेपांपैकी २५% ते ५०% आक्षेपांची लेखापरिक्षणास पुर्तता करण्यात यावी.** यासंदर्भात दर आठवड्याचे प्रत्येक सोमवारी अंतर्गत लेखापरिक्षणास लेखी स्वरूपातील अहवाल सादर करण्यात यावा. **अन्यथा यासंदर्भात आपले विरूध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.**

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

प्रति,

**शाखाप्रमुख्य**
**---------------- विभाग**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

C:\Documents and Settings\Administrator\Desktop\raj as on 15062015\auditpoint.docx